महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र लोकसेवा आयोग

मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☏२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☏२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक : १४४२(१)(४)/म. वि.प्र./२०२२/२३ दिनांक : २३ सप्टेंबर, २०२२.

**-: प्रसिद्धीपत्रक:-**

**विषय :-** पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा मुख्य परीक्षा- २०२१ निकालाबाबत.

**संदर्भ :-** अधिसूचना क्रमांक ५२/२०२२.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत शनिवार, दिनांक ३० जुलै, २०२२ रोजी आयोजित पोलीस उपनिरीक्षक मर्यादित विभागीय स्पर्धा मुख्य परीक्षा- २०२१ मधून शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल दिनांक २३ सप्टेंबर, २०२२ रोजी जाहीर करण्यात आला आहे. प्रस्तुत पदाकरीता मुख्य परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकासह नावाची यादी व गुणांची सीमारेषा आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

२. प्रस्तुत मुख्य परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पद्धतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, मुख्य परीक्षेच्या निकालाआधारे शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरविण्यात आले आहे.

३. आवश्यक तपासणीनुसार अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

४. सदर पदाच्या शारीरिक चाचणी व मुलाखत कार्यक्रम निश्चित झाल्यानंतर त्याबाबतचे प्रसिद्धीपत्रक आयोगाच्या संकेतस्थळावरुन प्रसिद्ध करण्यात येईल.

५. शारीरिक चाचणी डिजिटल तंत्रज्ञानावर अधारित प्रणालीद्वारे घेण्यात येईल. याबाबतचा सविस्तर तपशील स्वतंत्रपणे प्रसिद्ध करण्यात येईल.

६. प्रस्तुत परीक्षेचा निकाल विविध मुद्यांसंदर्भात मा. न्यायालयात/मा. न्यायाधिकरणात दाखल न्यायिक प्रकरणातील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून प्रसिद्ध करण्यात आला आहे.

७. प्रस्तुत मुख्य परीक्षेच्या निकालाच्या आधारे शारीरिक चाचणीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना त्यांनी अर्जात नमूद केलेल्या भ्रमणध्वनी क्रमांकावर लघुसंदेशाद्वारे (SMS) कळविण्यात येईल.

८. प्रस्तुत मुख्य परीक्षेसाठी सादर केलेल्या अर्जाद्वारे सादर केलेले दावे/अर्हतेच्या आधारेच निवडीसाठी पात्रता अजमाविण्यात येईल.

उप सचिव (परीक्षोत्तर) (अ.प.)
महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई.